सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कांदिवली पोलीस ठाणे, मुंबई यांचे कार्यालय.

Office of the Sr. Inspector of Police, Kandivali Police station, Mumbai

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयासमोर, एस.व्ही. रोड, कांदिवली (पश्चिम), मुंबई - ४०० ०६७.

Email ID ps.kandivali.mum@mahapolice.gov.in / Phone 022-28056603/28657922/28050904.

.....

प्रेस नोट

दिनांक ०५/११/२०२६

०९ वर्षांपासून खुनाच्या गुन्ह्यात फरार घोषित आरोपीस अटक केले बाबत

सेशन केस क्र. १४०/१९९६ (कांदिवली पोलीस ठाणे, गुन्हा रजिस्टर क्रमांक ४२३/१९९५, कलम ३०२ भादंवि) मधील स्थायी अजामीनपात्र वॉरंटातील फरार आरोपी नामे पारस शंकर यादव, तत्कालीन रा. लोकमान्य चाळ कमिटी नं. २, हनुमान नगर वडारीपाडा कांदिवली (पूर्व), मुंबई हा दि.१४.१२.१९९८ रोजी जामीनावर सुटून आल्यानंतर तो मिळून येत नव्हता.दि. ०३.०५.२०१७ रोजी त्यास फरारी घोषित करण्यात आले होते. प्रतिबंधक अधिकारी, स.पो.नि. माधवी कडव व प्रतिबंधक पथकातील पो.ह. श्री. वामन जायभाये तसेच पो.शि. श्री. अभिजित चव्हाण यांनी आरोपीचा फोटो व संपर्क क्रमांका बाबत कोणतीही माहिती नसताना ह्युमन इंटेलिजन्सच्या आधारे कौशल्यपूर्वक तपास करून गाव अहलादपूर, तहसील - थाना खानपूर, जिल्हा गाजीपूर, राज्य उत्तर प्रदेश येथून दि. ०३.११.२०२६ रोजी आरोपीला अटक केली.

अटक आरोपीचे नाव व पत्ता-

पारस शंकर यादव, वय- ५७ वर्षे, गाव- आहलादपुर खानापूर, जिल्हा - गाजीपुर, राज्य -उत्तर प्रदेश	

सदरची कामगिरी मा. श्री. देवेन भारती, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री. मनोजकुमार शर्मा, पोलीस सह आयुक्त (का. व सु.), मुंबई, श्री. शशीकुमार मीना, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई. मा. श्री. संदीप घुगे, पोलीस उप आयुक्त, उत्तर परि.-२, मुंबई. मा. श्री. संतोष धनवटे, सहाय्यक पोलीस आयुक्त, बोरीवली विभाग, मुंबई. श्री. करण सोनकवडे, वपोनि, कांदिवली पोलीस ठाणे, मुंबई. श्री. लक्ष्मण करांडे, पोलीस निरीक्षक (का.व. सु.) यांचे मार्गदर्शनाखाली प्रतिबंधक अधिकारी सहाय्यक पोलिस निरीक्षक माधवी कडव, पो.ह. वामन जायभाये,पो.शि. अभिजीत चव्हाण, पो.ह. तुषार सावंत, म.पो.ह.अंजना यादव, पो.शि. आदित्य राणे (तांत्रिक मदत) यांनी तपास करून फरार घोषित आरोपीतास अटक करून नमूद पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी उल्लेखनिय कामगिरी केली आहे.
